REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख ७ मे १९४७ अंक १९


★ एकूण चालू भांडवल तीन कोटींचे वर ★

★ ठेवीदारांची स्वतःची बँक ★

## दि न्यू सिटीझन बँक ऑफ इंडिया लि.

( हेड ऑफिसः—१६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई )

सतत व स्थिर प्रगतीचें रहस्य म्हणजेच बँकेनें गेलीं नऊ वर्षें आपुलकीच्या व सहानुभूतीच्या वृत्तीनें केलेल्या आपल्या गिऱ्हाइकांच्या सेवेचें फळ.

( १ ) जमा झालेलें भाग भांडवल व गंगाजळी ता. ३१–३–४७ रोजीं रु. ११,००,००० चे वर

( २ ) एकूण चालू भांडवल ता. ३१–३–४७ रोजीं

रु. ३,००,००,००० तीन कोटींचे वर

( ३ ) ता. १ आक्टोबर १९४६ पासून मुंबई क्लिअरिंग हाऊसचें स्वतंत्रपणें सभासदत्व ( Original Membership )

( ४ ) बँकेची स्वतःच्या इमारतीची खरेदी

बँकेनें स्वतःची इमारत अपोलो स्ट्रीटवर ( पार्शी बाजार विभागांत ), बॉंबे समाचार छापखान्याचे समोर, खरेदी घेतलेली असून सदरहु इमारतींत दिनांक १ मार्च १९४७ पासून बँकेच्या कांहीं खातीं नेलेलीं आहेत.

४४ चवेचाळीस शाखा व पे ऑफिसेस, मुंबई इलाख्यांतील महाराष्ट्र व मध्यप्रांत व वऱ्हाड या प्रांतांतून.
२ दोन शाखा हिंदुस्थानच्या राजधानींत, दिल्ली शहरांत.
१ एक शाखा पंजाबांत गुरगांव येथें. —एकूण ४७ सत्तेचाळीस शाखा—

—मुंबई येथील स्थानिक व महाराष्ट्र, मध्यप्रांत व वऱ्हाडमधील शाखा—

स्थानिक—१ दादर २ गिरगांव ३ ग्रँट रोड ४ जव्हेरी बझार ५ माटुंगा ६ सायन ७ विलेपार्लें

इतर—८ अहमदाबाद ९ अहमदनगर १० अकोला ११ अमरावती १२ बेळगांव १३ बडनेरा १४ चांदा १५ देवळाली १६ धुळें १७ इचलकरंजी १८ जळगांव १९ कारंजा २० कोल्हापूर २१ शाहुपुरी २२ कोपरगांव २३ लोणंद २४ महाड २५ मालेगांव २६ मिरज २७ मुर्तिजापूर २८ नागपूर २९ सीताबर्डी–नागपूर ३० नंदुरबार ३१ नाशिक सिटी ३२ नाशिक रोड ३३ पंढरपूर ३४ पेण ( कुलाबा ) ३५ पुणें ३६ पिंपळगांव ३७ संगमनेर ३८ सांगली ३९ सोलापूर ४० सिन्नर ४१ यवतमाळ ४२ नागपूर ४३ शहापूर ४४ शिवाजीनगर ( पुणें ).

—: डिव्हिडंड :—

क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअरवर इन्कमटॅक्ससुद्धां द. सा. दर शेंकडा ५ टक्केप्रमाणें सुरवातीपासून ३१–३–४६ पर्यंत. साध्या व डिफर्ड शेअर्सवर द. सा. द. शें. ५ व ६ टक्के करासुद्धां गेलीं तीन वर्षें व द. सा. द. शें. ३% टक्केप्रमाणें पहिल्या ५ वर्षांत असें डिव्हिडंड बँकेनें दिलें आहे.

बँकेस मान्य असलेल्या शेअर्सवर, सोनें, चांदी व सरकारी कर्जरोखे व शास्त्रशुद्ध बँकिंगच्या तत्त्वाला धरून बँकेस मान्य असलेल्या तारणावर बँक कर्ज देतें.

त्वरित व विश्वसनीय सेवा हें आमचें ब्रीदवाक्य व वैशिष्ट्य आहे.

अधिक माहितीसाठी एकाद्या शाखेकडे अगर मुख्य ऑफिसला लिहा.

डी. डी. देशपांडे
मॅनेजिंग डायरेक्टर.

## विविध माहिती

**अमेरिकेची जकातीसंबंधीं बोलणीं**—आंतरराष्ट्रीय व्यापार संवर्धनाच्या दृष्टीनें अमेरिका निरनिराळ्या राष्ट्रांशीं जकातीसंबंधीं वाटाघाटी करीत आहे. आतांपर्यंत ब्रिटन, कॅनडा, फ्रान्स व आस्ट्रेलिआ यांच्याशीं बोलणीं झालीं असून हिंदुस्थान, दक्षिण आफ्रिका आणि चिली या देशांशीं चर्चा नुकतीच सुरू करण्यांत आली आहे.

**संयुक्त राष्ट्रसंघाचा एक नवीन सभासद**—पॅलेस्टाइनच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं भरविण्यांत आलेल्या संयुक्त-राष्ट्र-संघाच्या खास अधिवेशनांत सयामला संघाचें सभासद करून घेण्यांत आलें. हिंदुस्थानतर्फे बॅ. असफअली यांनीं सयामच्या प्रतिनिधींचें स्वागत केलें.

**जागतिक शिक्षणतज्ञांचा मेळावा**—संयुक्त राष्ट्रसंघाच्या युनेस्को संघटनेतर्फे ३० निरनिराळ्या देशांतील १०० शिक्षण विषयक तज्ञ पॅरिस येथें ता. २१ जुलै ते ३० ऑगस्टपर्यंत जमणार आहेत. या मेळाव्यांत शिक्षणासंबंधीं व्याख्यानें, चर्चा, बोलपट, इत्यादी कार्यक्रम ठेवण्यांत आलेला आहे.

**बंगालमधील टेलिफोनला धोका**—पूर्व व पश्चिम बंगाल-मधील कांहीं भागांतून तांब्याच्या तारा चोरण्याची लाट उसळल्या-मुळें टेलिफोनचे व टेलिग्राफचे दळणवळण बंद पडण्याची भीती उत्पन्न झाली आहे. या चोऱ्यामुळें १६ एप्रिल रोजीं पूर्व बंगाल जगापासून जवळ जवळ अलग पडला होता असें समजतें. मध्य-वर्ती सरकारनें चोऱ्यांच्या बाबतींत कडक उपाय करण्यासंबंधीं बंगाल सरकारला कळविलें असल्याची वार्ता आहे.

**म्हैसूर संस्थानांत गंधक**—म्हैसूर संस्थानच्या खनिज संप-त्तीचें संशोधन करण्यासाठी तज्ञांचें एक मंडळ नेमण्यांत आलें होतें. या मंडळानें केलेल्या संशोधनावरून बंगलोरच्या उत्तरेस १५० मैलावर गंधकाची माती सांपडली असल्याचें समजतें. या मातीच्या थराची लांबी १,२०० फूट व रुंदी १२ ते १५ फूट आहे. थर जमिनीच्या पृष्ठभागापासून १५ ते २० फूट खाली सांपडतात. या खाणींचें उत्पादन दरवर्षी दीड लाख टन होईल असा अंदाज करण्यांत आला आहे.

**फ्रान्समध्यें मनुष्यबळाचा तुटवडा**—फ्रान्सच्या मुख्य प्रधानांनीं फ्रान्सला मनुष्यबळाचा आतां भयंकर तुटवडा पडत असल्याचें जाहीर केलें आहे. सध्यां फ्रान्समध्यें काम करीत असलेले जर्मन कैदी स्वदेशीं गेल्यावर तर हा तुटवडा अधिकच जाणवणार आहे. फ्रान्सला उत्पादन वाढविण्याची अत्यंत निकड असून तें वाढविणें, कारखान्याला लागणारी शक्ती ( पॉवर ) आणि मनुष्यबळ यांच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे.

**स्वीडनमधील अणु संशोधन**—स्वीडनमधील अणु-संशो-धन-मंडळानें अणु संशोधनासाठी एक कंपनी काढावी असा सल्ला त्या सरकारला दिला आहे. स्वीडनने आपल्या ताब्यांतील युरेनि-अमच्या मातीचा उपयोग करण्यास प्रारंभ केला आहे. नवीन कंपनी स्थापन झाल्यावर त्यांत अणु शक्तीचा औद्योगिक आणि वैद्यकीय उपयोग या संबंधींही संशोधन करण्यांत येणार आहे.

**भांडवल-नियंत्रण कायदा**—बँका आणि विमाकंपन्या व्यति-रिक्त इतर कंपन्यांना ५ लाख रुपये किंमतीपेक्षा अधिक रोखे विक्रीस काढावयाचे नसतील तर त्यासाठी परवानगीची गरज नव्हती. १९४७ च्या भांडवल नियंत्रण कायद्याप्रमाणें वरील तरतूद पुढेंही चालू ठेवण्यांत आली आहे.

### दि बँक ऑफ कोल्हापूर लि.

वरील बँकेनें १९४६ सालीं २,५३,००० रु. वसूल भांडवलावर व १ कोटि, ९१ लक्ष रु. खेळत्या भांडवलावर २,८८,८७६ रु. नफा मिळविला. ऑर्डिनरी शेअर होल्डर्सना १२½% करमाफ डिव्हि-डंड देण्यास १५,६०९ रु. लागले. प्रत्येक १०० रु. च्या डिफर्ड शेअरला २४९ रु. १५ आ. ९ पै करमाफ डिव्हिडंड पडलें. नोकर-वर्गास तीन महिन्यांच्या पगाराइतका बोनस ( १०,४४८ रु. ) मिळाला. अहवालाचे वर्षी बँकेनें मुंबई व निपाणी ह्या ब्रिटिश हद्दींत २ शाखा उघडल्या; म्हणजे तिच्या एकूण शाखांची संख्या ९ झाली आहे. बँकेच्या सर्व प्रकारच्या कर्जाचें ठेवींशीं प्रमाण ५३% व तारणावरील कर्जाचें एकूण कर्जाशीं प्रमाण ७५% पडत आहे. बँकेनें अहवालाचे वर्षी नोकरांना पगारवाढ व नव्या ग्रेडस दिल्या आहेत. बँक नवे शेअर्स लवकरच विक्री काढून वसूल भांडवल १०,१३००० रु करणार आहे. प्रत्येक शेअरमागें प्रीमियमचे ३० रु. मिळतील. त्यामुळें रिझर्व्ह फंडांत ४,५५,८५० रुपयांची भक्कम वाढ होणार आहे. "ट्रस्टी व एक्झिक्यूटर खातें" लवकरच सुरू करण्यांत येईल आणि सेफ डिपॉझिट व्हॉल्टचीहि व्यवस्था सत्वर होत आहे. कोल्हापुरांत क्लिअरिंग हाउस स्थापण्यांत बँक ऑफ कोल्हापूर पुढाकार घेत आहे. बँकेची २१ वी वार्षिक सभा ता. २० एप्रिल रोजीं झाली.

**कागदावरील नियंत्रण चालू रहाणार**—वृत्तपत्राचा कागद सोडून इतर प्रकारच्या कागदावरील नियंत्रण उठविण्यासंबंधीं दिल्लींत प्रांतिक सरकारांच्या प्रतिनिधींशीं हिंदुस्थान सरकारनें वाटाघाटी केल्या. सध्याची कागदाची टंचाई लक्षांत घेतां नियंत्रणें चालू ठेवण्यांत यावीं असा निर्णय घेण्यांत आला आहे.

"Consent of the Central Government has been obtained to this issue under Defence of India Rule 94–A by an order of which a complete copy is open to public inspection at the Head Office of the Company. It must be distinctly understood that in giving this consent the Government of India do not take any responsibility for the financial soundness of any of the schemes or for the correctness of any of the statements made or opinions expressed with regard to them."


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि०

## —पुणें—

**विक्रीस काढलेलें नवीन भांडवल रु. ७,००,०००**

**प्रत्येकीं रु. ५० च्या १४,००० भागांत विभागलेलें.**

कांहीं भाग नवीन अर्जदारांना देण्याचे ठरविले आहे तरी सध्यां शेअर होल्डर नसलेल्यांनींही अर्ज करावेत. हे भागही प्रत्येकी रु. ५ वाढीनें देक केले असून अर्ज बँकेच्या मुख्य कचेरींत ता. १५ मे पर्यंत पोहोंचले पाहिजेत. अर्जाबरोबर प्रत्येक भागाकरता भांडवलापैकीं रु. २५ व वाढीचे रु. ५ मिळून रु. ३० पाठवावयाचे आहेत.

सी. व्ही. जोग,
मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. ७ मे, १९४७



प्रा. वा. गो. काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## कंपनी कायद्यांत सुधारणा

### हिंदुस्थान सरकारनें तयार केलेलें बिल

१९१३ च्या हिंदी कंपनी कायद्यांत दुरुस्ती करणारें एक बिल मध्यवर्ती सरकारनें तयार केलें आहे. त्याचा कच्चा मसुदा सरकारी गॅझेटांत त्यावरील लोकमत अजमावण्यासाठी प्रसिद्ध करण्यांत आला आहे. मुंबई प्रांतांतील कोणत्याहि व्यक्तीस अगर संस्थेस प्रस्तुत मसुद्यावरील आपलें मत हिंदुस्थान सरकारास कळवावयाचें असल्यास, तें मुंबई सरकारच्या फिनॅन्स खात्याच्या सेक्रेटरीमार्फत ३१ मे १९४७ पूर्वी पाठविलें पाहिजे. लोकमत विचारांत घेऊन, सरकार आपल्या बिलाचा पक्का खर्डा तयार करील व नंतर लेजिस्लेटिव्ह असेंब्लींत मांडील. सरकारच्या कच्च्या खर्ड्यांतील कलमांचा विचार येथें केला आहे.

### मेमोरँडम व आर्टिकल्स सर्वांस उपलब्ध

कंपनीचे शेअर्स घेण्यापूर्वी सर्वांना तिचा मेमोरँडम आणि आर्टिकल्स ऑफ असोसिएशन ह्यांतील तपशिलाची माहिती असावी, ह्या दृष्टीनें कंपनी कायद्यांतील २५ व्या कलमांत दुरुस्ती सुचविण्यांत आली आहे. प्रत्येक कंपनीनें तिच्या प्रत्येक सभासदास ( त्यानें मागणी केल्यावर १४ दिवसांचे आंत ) आपला मेमोरँडम व आर्टिकल्स हीं पाठविलींच पाहिजेत, कसें मूळ कलम सांगतें. "प्रत्येक सभासदास" ह्या ऐवजी "कोणासहि" असे शब्द घातले, म्हणजे कोणासहि कोणत्याहि कंपनीचे हे कागदपत्र हमखास मिळूं शकतील. अर्थात्, कायद्याप्रमाणें त्याची ठरलेली किंमत त्यास द्यावी लागेलच. कंपनीनें आपल्या मेमोरँडमच्या व आर्टिकलच्या किती प्रति छापून ठेवल्या पाहिजेत, हा अवघड प्रश्न येथें उपस्थित होतो; कारण त्यांस अमर्याद मागणी आली तरी ती पुरविण्याची कायदेशीर जबाबदारी कंपन्यांवर पडण्याचा संभव दिसत आहे.

### सभासदांच्या इंडेक्समध्यें जोडनांवांचा तपशील

कंपनीच्या सभासदांच्या नांवांचा इंडेक्स तयार ठेवण्याची जबाबदारी तिचेवर ३१ अ ह्या कलमानें टाकलेली आहे. कित्येक शेअर्स दोन किंवा अधिक नांवांवर असतात आणि त्यांची सर्वांचीं नांवें इंडेक्समध्यें शोधणें अवघड जातें. ह्यासाठी, इंडेक्समध्यें प्रत्येक जॉइंट होल्डरचें नांव स्वतंत्रपणें दाखल करण्यांत यावें, अशी दुरुस्ती करण्यांत यावयाची आहे.

### शेअर्स वर्ग करण्याच्या धोरणास प्रसिद्धी

कंपनी कायद्याच्या ३२ व्या कलमाप्रमाणें तिला दरसाल आपल्या सभासदांची एक यादी तयार करावी लागते व तीमध्यें सभासदांचीं नांवें, पत्ते, धंदे, त्यांच्या शेअर्सची संख्या, वर्ग झालेल्या शेअर्सचा तपशील, इत्यादि गोष्टी नमूद कराव्या लागतात. ज्यांचे नांवे शेअर्स वर्ग करण्यासाठी अर्ज आले होते परंतु ते अमान्य करण्यांत आले, अशांची व त्यांत समाविष्ट असलेल्या शेअर्सची यादीहि कंपनीनें आतां दरसाल तयार करावयाची आहे. शेअर्स वर्ग करण्याबाबत कंपनीचें धोरण काय आहे, कोणते अर्ज मंजूर होतात, कोणते अर्ज नामंजूर होतात, इत्यादींची माहिती उपलब्ध व्हावी असा ह्या दुरुस्तीचा उद्देश आहे. शेअर ट्रान्स्फरच्या बाबतींत कंपनीस असलेल्या अधिकाराचा दुरुपयोग होत आहे काय, हें त्यामुळें समजून येणें सोपें पडेल. प्रस्तुत यादी कायद्याच्या तिसऱ्या परिशिष्टांत समाविष्ट होईल व त्यासाठी ई फॉर्ममध्यें एक तक्ता वाढविण्यांत येईल. त्यांत, अमान्य केलेल्या शेअर ट्रान्स्फर्सचा तपशील दरसाल द्यावा लागेल.

### कंपनीच्या अधिकाऱ्यांचा दाखला

सभासदांची यादी व इतर माहिती पुरवितांना ती खरी असल्याचा दाखला कंपनीच्या अधिकाऱ्यानें देणें बंधनकारक करण्यासाठी ३६ ( २ ) हें कलम दुरुस्त करण्यांत येत आहे.

### एकाच मॅनेजिंग एजन्सीखालील कंपन्यांमधील गुंतवणूक

एकाच मॅनेजिंग एजन्सीखालीं असलेल्या दोन कंपन्यांपैकी एकीनें दुसरीचे शेअर्स किंवा डिबेंचर्स घेऊं नयेत; घेणें असल्यास खरेदीदार कंपनीच्या डायरेक्टर बोर्डानें खरेदीपूर्वी तिला एकमतानें मान्यता दिलेली असली पाहिजे, असा निर्बंध ८७ फ कलमानें घातलेला आहे. मॅनेजिंग एजंटांच्या कारवाया शक्य तेवढ्या उजेडांत आणण्यासाठी, एवढें बंधन सरकारास पुरें वाटत नाहीं. अशा शेअर्स व डिबेंचर्समधील गुंतवणुकींची यादी कंपनीच्या वार्षिक सभेंत भागीदारांच्या संमतीसाठी मांडली पाहिजे, असा नवा निर्बंध सुचविण्यांत आला आहे.

### रिडीमेबल प्रे. शेअरवाल्यांना नवे शेअर मिळण्याचा अधिकार

कंपनीचें भांडवल वाढविण्याच्या वेळीं नवे शेअर्स विक्रीस काढण्यांत येतात. प्रत्येक सभासदाचे कंपनींत जितके शेअर्स असतील त्यांचे प्रमाणांत त्याला शेअर्स घेण्याची संधि १५० क ह्या कलमाप्रमाणें द्यावी लागते. जुने शेअर्स ऑर्डिनरी, प्रेफरन्स इ. कोणत्याहि वर्गाचे असले तरी त्यांस हा अधिकार मिळाला आहे. रिडीमेबल प्रेफरन्स शेअरवाल्यांना नवे शेअर्स मिळूं नयेत, कारण त्यांचे मूळ शेअर्सच कालांतरानें त्यांचे पैसे देऊन नष्ट करावयाचे असतात, असा युक्तिवाद आतां करण्यांत येत आहे व त्यास अनुसरून, "रिडीमेबल प्रेफरन्स शेअरवाले वगळून" हे शब्द १०५ क ह्या कलमांत घालण्यांत यावयाचे आहेत.

### डायरेक्टरांचा रिपोर्टः भिन्न मत धारण करणाऱ्या डायरेक्टरांस वाव

डायरेक्टरांनीं दरसाल कंपनीच्या ताळेबंदास एक रिपोर्ट जोडावयाचा असतो. त्यांत कंपनीच्या परिस्थितीचा आढावा घेतलेला असून डिव्हिडंड किती वाटावें, रिझर्व्ह फंडांत किती रकम टाकावी वगैरे गोष्टींचा खुलासा केलेला असतो. डायरेक्टरांनीं तसा अधिकार दिल्यास, त्यांचे वतीनें चेअरमननें एकट्यानें रिपोर्टावर सही केली तरी ती पुरते. आतां, हा रिपोर्ट सर्व डायरेक्टरांनीं एकमतानें मंजूर केला आहे, कीं त्याबाबत मतभेद झालेला आहे, हें भागीदारांस कळण्यास मार्ग नसतो. त्याचप्रमाणें, ज्या डायरेक्टरास रिपोर्ट

मान्य नाहीं, त्याचें मतहि उघडपणें कळूं शकत नाहीं. ह्यासाठी १,३१ अ(२) ह्या कलमांत दुरुस्ती सुचविण्यांत येत आहे. "हजर असलेल्या डायरेक्टरांनीं रिपोर्टास एकमतानें मान्यता दिली किंवा नाहीं हें रिपोर्टांत सांगितलें पाहिजे; विरोधी डायरेक्टरास रिपोर्टाला भिन्न मत जोडण्यास अधिकार आहे आणि हें मत रिपोर्टांत छापून तें रिपोर्टाचा भाग म्हणूनच समजलें जाईल." अशा स्वरूपाची नियोजित दुरुस्ती आहे.

### ऑडिटरचें सर्टिफिकेटहि रजिस्ट्रारकडे नोंदलें पाहिजे

रजिस्ट्रारकडे कंपन्यांचे कांहीं कागद दरसाल कायद्याप्रमाणेंच नोंदावे लागतात. रजिस्ट्रारला त्या कागदांतील तपशीलाबाबत अधिक खुलासा हवा असला तर तो कंपनीस लेखी हुकूम करून तिचेकडून तपशील मागवूं शकतो. मुंबईच्या रजिस्ट्रार ऑफ कंपनीजला एका प्रकरणीं ऑडिटरच्या सर्टिफिकेटांतील, कंपनीच्या व्यवस्थेबाबत कांहीं विधानावरून असा तपशील हवा होता. परंतु ऑडिटरचें सर्टिफिकेट रजिस्ट्रारकडे नोंदविण्याची तजवीज आजच्या कायद्यांत नसल्यानें रजिस्ट्रारला तसा तपशील अधिकारानें मागतां येईना. डायरेक्टरांच्या रिपोर्टाबरोबर ऑडिटरचा रिपोर्टहि रजिस्ट्रारकडे नोंदविण्यांत यावा, असा स्पष्ट आदेश देण्यासाठी १३७ (१) हें कलम दुरुस्त केलें जावयाचें आहे.

### ऑडिटरनें साधारण सभेस उपस्थित राहिलें पाहिजे

कंपनीच्या ऑडिटरला कंपनीच्या साधारण सभेची नोटीस देण्यांत आली पाहिजे; ऑडिटरला, ज्या सभेंत त्यानें तपासलेले हिशेब मांडले जावयाचे अगर चर्चिले जावयाचे आहेत, अशा सभेस उपस्थित होण्याचा व जरूर तो खुलासा करण्याचा अधिकार आजच्या कायद्यांतहि आहे. परंतु, ऑडिटर सभांना हजर रहातातच असें नाहीं. अशा प्रत्येक सभेंत त्याची उपस्थिति त्याचेवर बंधनकारक करण्यासाठी १४५ (४) हें कलम सुधारण्यांत येईल.

## महाराष्ट्रीय बँकांचें पाऊल संघटित रीतीनें कसें पुढें पडेल?

### न्यू सिटिझनचे श्री. डी. डी. देशपांडे, ह्यांची मुलाखत

न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. चे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. डी. डी. देशपांडे हे गेल्या आठवड्यांत पुणें येथें आले असतांना, त्यांची आमच्या प्रतिनिधीनें भेट घेऊन, त्यांची महाराष्ट्रीय बँकांच्या संघटना विषयक योजनांसंबंधीं मुलाखत घेतली. महाराष्ट्रीय बँकांचें एकमेकांशी अधिक हार्दिक सहकार्य होण्याची आवश्यकता श्री. भाऊसाहेब आज कित्येक वर्षे प्रतिपादन करीत आहेत.

### महाराष्ट्रीय बँकांची असोसिएशन

ह्या सहकार्याचें मूर्त स्वरूप कोणत्या प्रकारचें होईल, असा प्रश्न त्यांस विचारला असतां, ते म्हणाले, "कांहीं फसवे कर्जदार असतात, त्यांचा प्रत्येकानें कटु अनुभव घेण्याऐवजी, एकास आलेला अनुभव त्यानें बाकीच्यांस कळविला तर कितीतरी उपयोग होण्याजोगा आहे. हीच गोष्ट अनिष्ट ठेवीदारांची. महाराष्ट्रीय बँकांची एक असोसिएशन स्थापन झाली व तिचेकडे अशी माहिती एकत्रित करून ताजी राखण्यांत आली, तर सर्वांच्याच हिताचें संरक्षण होणार आहे. एका बँकेनें लबाडी करणाऱ्या नोकरास काढून टाकलें असलें, तरी तो दुसऱ्या बँकेंत ज्यास्त पगाराची नोकरी मिळवूं शकतो, ही गोष्टहि बँकांची प्रभावी संघटना अशक्यप्राय करूं शकेल. मोठीं औद्योगिक कर्जें देण्यासाठी स्वतंत्र अशी महाराष्ट्रीय बँक नाहीं. परंतु, अनेक बँकांनीं एकत्र येऊन जोखीम विभागून अशीं कर्जें दिलीं, तर महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांस आवश्यक तें भांडवल मिळूं शकेल व कोणत्याहि एका बँकेवर निष्कारण ताण पडणार नाहीं." ह्या नियोजित असोसिएशनमध्यें कोणत्या बँकांचा समावेश होईल? ह्या प्रश्नास उत्तर देतांना श्री. भाऊसाहेब म्हणाले, "त्यांत शहरी सहकारी बँकाहि येऊं शकतील. परंतु महाराष्ट्रांतील परकीयांच्या बँकांस मात्र ह्या असोसिएशनमध्यें वाव मिळणार नाहीं. महाराष्ट्रीय हुकमतीखालील बँक ती महाराष्ट्रीय बँक. त्यांत मध्यप्रांत आणि वऱ्हाड ह्यांतील महाराष्ट्रीय बँका पण येतील."

### बँकांची ट्रस्ट कंपनी

मुंबईमधील बँकिंगच्या क्षेत्रांत कांहीं दिवसांपूर्वी विशिष्ट परिस्थिती निर्माण झाली होती, तिचेपासून महाराष्ट्रीय बँकांना कांहीं बोध घेतां येण्याजोगा आहे काय? असा प्रश्न श्री. भाऊसाहेब ह्यांस विचारला. "बँका आपल्या कर्जासाठी सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, घरें इत्यादि मालमत्ता लावून घेतात. परंतु, बँकेला स्वतःला एकदम पैसा उभा करावयाची वेळ आली तर सरकारी रोख्याखेरीज बाकीच्यांचा कांहींच उपयोग होत नाहीं, असा सर्व बँकांचा ताजा अनुभव आहे" असें सांगून त्यांनीं ट्रस्ट कंपनीची आपली योजना विशद केली. "सुमारें २० लक्ष रुपये वसूल भांडवलाची आणि २ कोटि रुपये सेलत्या भांडवलाची एक ट्रस्ट कंपनी बँकांनीं व विमा कंपन्यांनीं सहकार्यानें उभारावी आणि ह्या ट्रस्ट कंपनीनें बँकांना त्यांच्याकडे गहाण असलेल्या मालमत्तेवर कर्ज द्यावें, म्हणजे बँकांची पैसा उभारून तो पुरविण्याची शक्ती वाढेल. बँकांजवळील कर्जरोखे हे त्यांना केव्हांहि कर्ज काढण्यास उपयोगी पडतातच; परंतु बँकांच्या तिजोऱ्यांत पडून रहाणारे कागदपत्र व गुदामांत ठेवलेला माल ह्यांचे तारणावर बँकांना कर्जें मिळावींत व अशा रीतीनें तारणाचा आधिकांत अधिक व्यावहारिक उपयोग व्हावा, अशी ही योजना आहे. बँकांचीं कर्जें देण्याची शक्ती त्यामुळें पुष्कळच वाढेल. मी ह्या दृष्टीनें प्रयत्न चालविले असून लवकरच त्यास मूर्त स्वरूप येईल असें ते म्हणाले."

### सहकार्याची कळकळीनें मागणी

जातां जातां, श्री. भाऊसाहेब ह्यांनीं, रिझर्व्ह बँक इतर बँकांच्या मदतीस तातडीनें जाऊं शकत नाहीं ह्याबद्दल असमाधान व्यक्त केलें. कायद्यानें रिझर्व्ह बँकेचा कारभार बांधून टाकलेला आहे हें खरें आहे व त्या कायद्यांत इष्ट ती सुधारणा होणें आवश्यक आहे, असें ते म्हणाले. "न्यू सिटिझन बँकेनें प्रथमपासूनच नफा कमी झाला तरी आपले पैसे तरते ठेवण्याचें धोरण अवलंबिलें आहे. त्या धोरणाचें महत्त्व मामुली काळांत भागीदारांना पटत नाहीं. परंतु सध्यासारख्या संक्रमण काळांत न्यू सिटिझननें आपला लौकिक कायम राखला, इतकेंच नव्हे तर तिच्याकडील ठेवींत वाढ होत चालली आहे. ह्याचें सर्व श्रेय आमच्या तरतेपणाच्या व भक्कमपणाच्या लौकिकासच आहे. महाराष्ट्रीय बँकांच्या संघटनेबाबत आणि रिझर्व्ह बँकेच्या सदोष कायद्यांत सुधारणा घडवून आणण्याबाबत मी खटपट करीत आहें, ती सर्वच बँकांच्या हिताच्या दृष्टीनें आहे, आणि त्यांत मी महाराष्ट्रीय बँकांच्या हार्दिक सहायाची अपेक्षा करतों. माझ्या योजनेंत त्यांनीं जरूर ती सुधारणा करावी आणि प्रभावी सहकार्यानें महाराष्ट्रीय बँकांच्या उपयुक्ततेच्या वाढीस अवश्य हातभार लावावा" असे उद्गार श्री. भाऊसाहेब ह्यांनीं काढले.

## परदेशांतील व्यापारी बातम्या

**ऑस्ट्रेलिआंतील अन्नधान्य वांटप**—इंग्लंड सोडून दिलें तर ऑस्ट्रेलिया हा एकच ब्रिटिश साम्राज्यांतील देश असा आहे कीं. जेथें युद्धकाळांतल्याप्रमाणेंच अन्नधान्याच्या वांटपाचें प्रमाण चालू आहे. वरील माहिती ऑस्ट्रेलिआच्या मुख्य प्रधानांनीं जाहीर केलेली आहे.

**ट्रॅन्सजॉर्डनमधील ब्रिटिश लष्कराचा खर्च**—ट्रॅन्सजॉर्डनमधील अरबलीजन या लष्करी संघटनेचा वार्षिक खर्च अदमासें २० लाख पौंड आहे अशी माहिती कॉमन्स सभागृहांत सांगण्यांत आली. ब्रिटनबाहेरच्या देशांत सैन्य ठेवण्याचा हा खर्च ब्रिटिश जनतेच्या माथीं बसतो.

**रशिआचा अरबांना पाठिंबा**—पॅलेस्टाइनच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं भरविण्यांत येणाऱ्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या खास अधिवेशनांत रशिआ अरबांना पाठिंबा देणार असल्याची बातमी आहे. अमेरिकेचा ज्यू लोकांना असणारा पाठिंबा उघडच आहे.

**ब्रिटनमधील कोळशाच्या टंचाईचा परिणाम**—ब्रिटनमध्यें हिंवाळयामुळें नुकतीच जी कोळशाची तूट पडली त्यामुळें ब्रिटिश कामगारांचें १० लाख पौंडाचें नुकसान झालें. नोव्हेंबर १९४६ मध्यें ब्रिटनमधील सुताचें जें उत्पादन होतें त्याच्या फक्त एक चतुर्थांश उत्पादन फेब्रुआरी १९४७ मध्यें झालें.

**घड्याळासाठी जकातीच्या भिंती**—अमेरिकेंतील घड्याळ कामगारांच्या संघटनेतर्फे अशी मागणी करण्यांत आली आहे कीं, अमेरिकेंत खपणाऱ्या घड्याळांच्या ५० टक्केच घड्याळें स्वित्झर्लंडमधून आयात होऊं देण्यांत यावीं. स्विस घड्याळांच्या कमी किंमतीमुळें अमेरिकेच्या घड्याळाचा धंदा डळमळण्याचा संभव या संघटनेला वाटत आहे.

**पोलंड व इजिप्त ह्यांचा अदलाबदलीचा व्यापार**—इजिप्तकडून ७ हजार टन कापूस घेऊन त्यांच्या बदला १ लाख, ५० हजार टन कोळसा देण्याची तयारी पोलंडनें दाखविली आहे. या दोन वस्तूंच्या किंमतींत पडणाऱ्या फरकाची रकम कर्ज समजण्यांत येऊन तें कोळसा व इतर वस्तूंच्या मोबदल्यानें फेडण्याची पोलंडची योजना आहे.

**युगोस्लाव्हिआचा पंचवार्षिक कार्यक्रम**—युगोस्लाव्हिआनें १५ कोटी पौंडांचा पंचवार्षिक कार्यक्रम आखला आहे. या कार्यक्रमांत देशाचें औद्योगीकरण, वीज निर्मितीचीं केंद्रें आणि शेतीसंबंधीं नियुक्त अर्थयोजना यांचा समावेश करण्यांत आला आहे. हा कार्यक्रम पार पडला तरच युगोस्लाव्हिआला आर्थिक स्वातंत्र्य मिळूं शकेल असे उद्गार मुख्य प्रधान मार्शल टिटो यांनीं पार्लमेंटांत बोलतांना काढले.

**हंगेरीचा संयुक्त राष्ट्रसंघाला अर्ज**—संयुक्त राष्ट्रसंघाचे आपणांस सभासद करून घ्यावें असा अर्ज हंगेरीनें संयुक्त राष्ट्रसंघाकडे केला आहे. शत्रुराष्ट्रांपैकीं संयुक्त राष्ट्रसंघटनेंत सामील होण्याविषयीं अर्ज करणारें हें पहिलेंच राष्ट्र आहे.

**रंगीत पोलादाचा शोध**— एन्. गुडस्टाव्ह नांवाच्या एका शास्त्रज्ञानें सोनेरी आणि गुलाबी रंगाचें पोलाद निर्माण करण्यांत यश मिळविलें आहे. हें पोलाद न गंजणारें असून त्याचा इतर धातूंशीं मिलाफहि होऊं शकतो. रशिआंत हें पोलाद इमारतींच्या शोभेसाठीं आणि स्मारकानिमित्त उभारण्यांत येणाऱ्या पुतळ्यांसाठीं वापरण्यांत येऊं लागलें आहे.

**हिंदी गालिच्यांची बाजारपेठ**—युरोपमधून व इतरत्रहि हिंदी गालिच्यांना मागणी वाढत चालल्यानें त्यांच्या किंमती तूर्त तरी उतरण्याचा संभव नाहीं. या वाढत्या किंमतीमुळेंच गालिच्यांची बाजारपेठ अनिश्चित होण्याचा संभव आहे असें म्हणतात.

**रशिआ-अमेरिका दर्यावदी वळणवळण**—रशिआ आणि अमेरिका या दोन देशांत नियमितपणें प्रवाशांची वाहतूक करणाची सोय आतां झाली आहे. ता. ५ मे रोजीं 'रोशिआ' नांवाची रशिअन बोट ओडेसाहून निघाली आहे. या बोटीचें वजन १७,८७० टन असून उतारूंची वहातूक करणारी रशिआची ती सर्वांत मोठी बोट आहे असें म्हणतात.

**मोटारींचें उत्पादन**—१ जानेवारी तें १८ एप्रिल १९४७ ह्या मुदतींत अमेरिकेनें १० लक्ष मोटार गाड्यांचें उत्पादन केलें. ह्याच मुदतींत ४ लक्ष ट्रक्स तयार झाल्या.

**नेपाळचें औद्योगीकरण झपाट्यानें होणार**—अमेरिकन आर्थिक शिष्टमंडळानें नेपाळला नुकतीच भेट दिली. त्याचा दृश्य परिणाम. म्हणून नेपाळमध्यें उद्योगधंद्यांची झपाट्यानें वाढ होईल अशी बातमी आहे. कोसी नदीवर धरण बांधून वीज उत्पन्न करण्याच्या योजनेची प्राथमिक पहाणी करण्यासाठी अमेरिकेचे सुप्रसिद्ध एंजिनिअर मि. सॅव्हेज नेपाळला गेले होते. कोसी योजनेंत नेपाळचें सरकार भांडवल गुंतविणार आहे. याशिवाय हिमालयांतून निघून संयुक्त-प्रांतांत वहाणाऱ्या गंडकी नदीचाहि असाच उपयोग करून घेण्याचा नेपाळ सरकार विचार करीत आहे.

**जपानच्या उद्योगधंद्यांना मर्यादा**—जपानमध्यें १९३० ते १९३४ च्या दरम्यान लोकांच्या रहाणीचें जें मान होतें, तेवढें टिकविण्यापुरतेंच जपानचे कारखाने शाबूद ठेवण्यांत यावे असें ठरविण्यांत आलें आहे.

**अन्नपरिस्थिति अधिक विकट होणार?**—कृत्रिम खतें तयार करणारे शत्रूच्या देशांतील कारखाने मोडून टाकण्याचें मित्र राष्ट्रांचें धोरण अत्यंत घातुक आहे; कारण सबंद युरोपांत खतांचा भयंकर तुटवडा भासत आहे. गेल्या दहा वर्षांत जगाच्या लोकसंख्येंत ७% ची भर पडली आहे. चालू वर्षापेक्षां येतें वर्ष अधिक वाईट जाईल, असें दिसूं लागलें आहे. अमेरिकेचे माजी प्रेसिडेंट, मि. हूवर, ह्यांनीं नुकतीच युरोपांतील अन्नपरिस्थितीची पहाणी केली आणि वरीलप्रमाणें आपला अभिप्राय व्यक्त केला.

**जर्मन लक्षाधीशाची चौकशी**—जर्मनीच्या पोलादाच्या धंद्यांतलि दादा म्हणून प्रसिद्ध असलेला कारखानदार फ्रेडरिक फ्लिक याची न्यूरेंबर्ग येथील आंतरराष्ट्रीय लष्करी कोर्टापुढें चौकशी सुरू झाली आहे. युद्धाच्या अखेरीस जर्मनींतील सर्वांत अधिक श्रीमंत कारखानदार म्हणून त्याची प्रसिद्ध झालेली होती.

**हिंदुस्थानांतील रस्ते बांधणीसाठी तज्ज्ञ**—आधुनिक पद्धतीचे रस्ते बांधण्याचें शिक्षण घेण्यासाठी २० एंजिनिअर्सचें एक मंडळ अमेरिकेला पाठविण्याची योजना हिंदुस्थान सरकारनें केली आहे. या मंडळांत २० प्रतिनिधींचा समावेश करण्यांत येणार आहे.

**कालव्याच्या पाण्याची चोरी**—उसाचें पीक करणें अत्यंत किफायतशीर झालें असल्याकारणानें कालव्याचें पाणी चोरून घेऊन तें उसास देण्याचें आकर्षण फार वाढलें आहे. कालव्याची व्यवस्था पाहाण्यासाठी येणाऱ्या खर्चापैकीं एक चतुर्थांश खर्च अशा चोऱ्यांमुळें होणारी कालव्याची नुकसानी दुरुस्त करण्यासाठी होतो. श्रीमंत मळेवाल्यांविरुद्ध साक्षी देण्यास लोक धजावत नाहींत; गरीब तेवढे सापडतात.

## दि बँक ऑफ् सिटिझन्स लि., बेळगांव

**( बँकेची स्थापना : १९३७ )**

**तुलनात्मक प्रगतीचा तक्ता**

| ताळेबंदाचें वर्ष | जमा शेअर भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निवळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर ( % करमाफ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | रु. | |
| १९३८ | १०,८६० | — | ५१,७३६ | ६२,७६६ | — | — | — | — |
| १९३९ | १२,७०० | — | ८७,६६६ | १,००,९५४ | ५,३९८ | ७६९ | ५०३ | |
| १९४० | ४०,६३५ | १५० | १,१४,५४५ | १,५७,१०४ | ७,७७३ | १,६७५ | ७७१ | |
| १९४१ | ४५,८२० | ५५० | २,०७,१५९ | २,५८,९४२ | १४,१०९ | ३,०४५ | २,२६८ | |
| १९४२ | ६१,२७० | १,३२५ | ५,४२,३८८ | ६,१४,७८२ | २५,५२८ | ४,७६० | २,६२९ | |
| १९४३ | ७९,२७० | ३,३२५ | १३,०५,७५७ | १४,१६,९२५ | ४९,९०६ | १५,२३४ | ३,३७४ | |
| १९४४ | १,००,००० | १०,०१५ | २४,६८,७५६ | २६,३७,१२५ | ९३,०६८ | २८,५९३ | ५,६११ | |
| १९४५ | २,४२,७०० | ४०,७९० | ३१,६२,२०२ | ३७,१३,३२१ | १,३६,६६६ | ३५,६२३ | १२,५७९ | |
| १९४६ | ३,३९,३५० | ६७,७९० | ४६,१४,४१६ | ५१,१८,०५४ | २,३४,४९१ | ५८,४७७ | १९,९५६ | |

**शाखांच्या स्थापनेचा अनुक्रम—**

| १९४१/४२ | १९४२/४३ | १९४३/४४ | १९४४/४५ | १९४५/४६ |
|---|---|---|---|---|
| गणपतगल्ली | निपाणी | धारवार | बैलहोंगल | कारवार |
| खानापूर | चिक्कोडी | नंदगड | हल्याळ | शिर्सी |
| अळणावर | | कँप | हुबळी | |
| | | ठळकवाडी | | |

## दि भारत इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें.

**( स्थापना १४ एप्रिल १९३८ )**

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा :—१ पुणें कॅन्टोन्मेंट, २ बारामती, ३ लोणावळा, ४ बेलापूररोड, ५ ओझर (तांबट) जि. नासिक, ६ खोपोली पे-ऑफिस.

**तुलनात्मक प्रगतीचा तक्ता**

| ताळेबंदाचें वर्ष | मुदत | जमा शेअर भांडवल | रिझर्व फंड | ठेवी | खेळतें भांडवल | एकूण नफा | निव्वळ नफा | एकूण डिव्हिडंडची रक्कम | डिव्हिडंडचा दर प्रेफरन्स | डिव्हिडंडचा दर ऑर्डिनरी | नव्या शाखा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | % | % | |
| १९३९ | इंटेरीम १० म. २ दि. | ६२,४७० | ४० | ६४,५०० | १,२८,१०० | ३,५०० | २०० | ... | ... | ... | ... |
| १९४० | म. ११ | ८४,२१० | ४४० | १,५९,२०० | २,४७,१०० | ७,९०३ | १,९०० | १,२६० | ६ | ... | ... |
| १९४१ | म. १२ | ९०,७३० | ८३० | १,८५,६०० | २,९५,२०० | १२,००० | १,९०१ | १,३५० | ६ | ... | ... |
| १९४१ | म. ४ | ९१,९९० | १,०२० | २,२३,६०० | ३,२८,००० | ५,९०० | ९७० | ७८० | ६ | ... | ... |
| १९४२ | म. १२ | ९७,०३० | २,१७० | ३,७९,१०० | ५ १४.००० | १८,३०० | ५,६८० | ४,१६० | ६ | ३ | ... |
| १९४३ | म. १२ | ९९,४४० | ५,११० | १५,८६,३०० | १७,७९,००० | ४८,१०० | १५,०४० | ४,१२० | ६ | ४ | (१) कॅन्टोन्मेंट पुणें (२) बारामती खोपोली पे-ऑफिस |
| १९४४ | म. १२ | १,६९,१८० | ७,५२० | २२,१०,४०० | २५,१९,००० | ८१,६०० | ११,५७० | ४,६४० | ६ | ४ करमाफ | (३) लोणावळा |
| १९४५ | म. १२ | २,२९,८९० | ११,१२० | ३४,३३,२०० | ३९,४९,००० | १,११,५२० | १७,९१० | ८,५१० | ६ | ४+½ करमाफ | (४) बेलापूर रोड (५) ओझर |
| १९४६ | म. १२ | ३,९६,२४० | २२,००० | ४७,४१,८०० | ५५,४५,००० | १,९० १०० | ५२,०८० | १३,८७० | ६ | ४+½ करमाफ | ... |

**गव्हाच्या किंमती:—**ग्राहकांच्या खिशाला चट्टा न बसतां गहूं पिकविणाऱ्या शेतकऱ्यांचेंही उतरत्या बाजारभावानें नुकसान होऊं नव्हे म्हणून मध्यवर्ती सरकारनें पंजाब, संयुक्त प्रांत व सिंध प्रांत येथील साधारण चांगल्या दर्जाचा गहूं ७ रु. ८ आणे मण प्रमाणें घेण्याची हमी १९४४ एप्रिल पासून दिली होती. ही हमी १९४५–४६ आणि १९४६–४७ सालींही देण्यांत आली होती. आतां हीच हमी आणखी १२ महिन्यांकरितां वाढविण्यांत आली आहे.

**विजेच्या उपकरणांची निर्मिती—**हिंदुस्थान सरकारनें नेमलेल्या इंडस्ट्रिअल पॅनेलनें हिंदुस्थानांत लहान सहान व अवजड अशी दोन्ही प्रकारची विजेची यंत्रसामुग्री तयार करण्याबद्दलचा आपला अहवाल पुरा केला आहे.

**ऑल इंडिआ टेक्निकल कौन्सिल—**या संस्थेची पुढील वार्षिक बैठक म्हैसूर सरकारच्या आमंत्रणावरून म्हैसूर येथें २७ ते ३० मेपर्यंत भरणार आहे. उच्च प्रतीच्या तांत्रिक शिक्षणाची हिंदुस्थानांत किती गरज आहे याचा अभ्यास करण्यासाठी ही संस्था १९४५ मध्यें हिंदुस्थान सरकारनें स्थापन केली. म्हैसूर येथील बैठकीला प्रांतिक सरकारें, मध्यवर्ती सरकार, हिंदी संस्थानें, व्यापारी व औद्योगिक संस्था, मजूर आणि शिक्षणसंस्था यांच्यातर्फे मिळून ७० प्रतिनिधी उपस्थित रहाणार आहेत.

**हिंदुस्थानांतील चहाचें उत्पादन—**हिंदुस्थानांतील चहाचें गतवर्षीचें उत्पादन अंदाजें ५६ कोटी, २० लाख पौंड झालें असावें अशी माहिती उपभारतमंत्री मि. ऑर्थर हेंडरसन यांनीं कॉमन्स सभेंत सांगितली. चहाच्या वार्षिक उत्पादनांत १९४२ सालाचा नंबर पहिला लागतो.

## दि बँक ऑफ औंध लि.

( औंध संस्थानांत स्थापन झालेली, भागीदारांची जबाबदारी नियमित )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | ... रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल ... | ... रु. ३,०९,१२० |
| भरणा झालेलें भांडवल | ... रु. १,५४,५६० |
| खेळतें भांडवल ... | ... रु. २०,००,००० चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड्स् | ... रु. ७३,१०० |

**रजिस्टर्ड ऑफिसः–औंध**

—ःमुख्य बिझिनेस ऑफिसः—

१६८, भवानी पेठ, पॅलेस स्ट्रीट, सातारा शहर.

—शाखा—

आटपाडी, बिचूद रे. स्टे. व ओगलेवाडी.

**संचालक मंडळ**

१. श्री. मा. रा. जोशी, पुणें, ( अध्यक्ष ). २ श्री. रा. बा. बिद्री, औंध. ३. श्रीमंत बापूसाहेब पंत, औंध. ४. श्री. दिवाणबहादूर मो. बा. मुथा, सातारा. ५ श्री. रावसाहेब कृ. दि. माजगांवकर, सातारा. ६ शेठ कालीदास भाईचंद, सातारा. ७ श्री. व. श्री. सातवळेकर, औंध. ८. श्री. शेठ शुभकर्ण बोत्रा, बिचूद रेल्वे स्टेशन. ९. श्री. वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

वा. रा. वर्तक, मॅनेजिंग डायरेक्टर.

## शेअर्स विकणें आहेत.

डुप्लीकेटर्स, शटल्स, प्रोसेस व फोटोग्रॅफिक कॅमेरे व इतर बऱ्याच प्रकारची उंची मशिनरी तयार करणारे सुप्रसिद्ध

## मेसर्स शेवडेज कॅमेरा वर्क्स लि., बेळगांव.


यांचे विक्रीस काढलेले प्रत्येकीं १० रुपयांचे २०,००० शेअर्सपैकीं फारच थोडे शेअर्स विकाऊ आहेत.

अर्ज व इतर माहितीसाठी खालील पत्त्यावर लिहाः—

**आर. जे. सावंत**
शेअर्स व स्टॉक ब्रोकर्स
६२, न्यू स्टॉक एक्स्चेंज बिल्डिंग,
अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.




## पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवणयाच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८

## साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

**व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी**




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

# मुंबई शेअर बाजार

व्याज-वजा

( वि. म. लिमये आणि मं. यांजकडून ) स्वदेशी रु. २७ दि. २८।५।४७

साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † संडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार २९।४।४७ | बुधवार ३०।४।४७ | गुरुवार १।५।४७ | शुक्रवार २।५।४७ | सोमवार ५।५।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३११७८; २९२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २२२५ | २२२५ | २२२५ | २२०५ | २१३० |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४३४-८ | ४१४ | ४१६-८ | ४१४-८ | ४०१ |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | २७-६ | २७-१० | २७-१० | २६-१४ | २६-२ |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ३५-६ | ३५-११ | ३५-१० | ३४-१४ | ३३-१४ |
| | 'बोनस शेअर' | | | | | | | | |
| ३१७७-८; २१३२-८ | ४०-०-०S | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | ११४५ | ११३५ | ११३२-८ | ११०५ | १०५० |
| ११८०; ६५८ | १३-०-०S | मार्च-सेप्टें. | कोहिनूर | १०० | ६७१ | ६६४ | ६६३ | ६६४ | ६६९ |
| ९९९; ६६० | २७-०-० | मे | स्वदेशी | १०० | ६३४ | ६३० | ६३२ | ६२८ | ६१९ |
| ५६७; ३९८ | २-०-०† | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | २९३ | २९० | २९० | २८८ | २८० |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३१७ | ३१६ | ३२० | ३१६ | ३०९ |
| ५७१; ३२३ | १२-०-०S | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३०९ | ३०५ | ३०६ | ३०५ | ३०३ |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३२८ | ३२४ | ३४० | ३३७ | ३२९ |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-६-६ | ४-७ | ४-७-० | ४-६-६ | ४-७-० |
| २९-१; १६-१२ | ०-१३-९ | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १६-४-६ | १६-४-६ | १६-४ | १६-० | १५-११ |
| ६-११-६; ३-३-६ | ०-२-६ | मे | ,, डिफर्ड्स | १ | ३-५-६ | ३-६ | ३-५ | ३-४ | ३-४ |
| ११९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६०० | ५८५ | ५८५ | ५८५ | ५६७-८ |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १८२-८ | १८०-८ | १८०-८ | १७९-८ | १७५-८ |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २३९ | २६७ | २६७ | २६६-० | २५८ |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ४७५ | ४७२-८ | ४७० | ४६७-८ | ४५७-८ |
| ६०-१०; ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३२-१३ | ३२-८ | ३२-८ | ३२-६ | ३१-२ |

**हैद्राबाद संस्थानच्या रेल्वेंत वाढ**—हैद्राबाद संस्थानांतील रेल्वेचा रस्ता ६०० मैल अधिक वाढविण्यांत येणार आहे असें समजतें. या योजनेला ८ कोटी रुपये खर्च येणार असून ती ५ वर्षांत पुरी करण्यांत येणार आहे. निझामच्या रेल्वे अधिकाऱ्यांनीं या वाढीसाठी ७० प्रवासी डबे आणि ३०० माल-वहातुकीच्या वॅगन्स मागविल्या आहेत. रेल्वेला १५ नवीं एंजिनें मिळालीं आहेत.

**भांडवल उभारणीसंबंधी नवे अधिकारी**—हिंदुस्थान सरकारनें भांडवल सरतपासनीस आणि दुय्यम तपासनीस यांच्या ऐवजीं त्याच अधिकाराचे दोन भांडवल नियंत्रक अधिकारी नेमले आहेत. या अधिकारांत बँकिंग व विमा कंपन्या सोडून इतर कंपन्यांना ५० लाखाचे रोखे काढावयाचे नसतील तर त्यांना तशी मुभा देण्याचा अधिकार होता.








-सर्व प्रांतांतील-
सुती - गरम - रेशमी
—खादीचा उत्तम संच—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
हमडेरे बोळाजवळ,
पुणें २

पुणें—प्रदर्शनांतील स्टॉल नं. १४० पहाण्यास विसरूं नका.

## ब्रिटनची १९४७ ची आर्थिक पाहाणी

लेखकः—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी.

ब्रिटनमध्यें मजूर सरकार जुलै १९४५ मध्यें अधिकारारूढ झालें. सत्तास्वीकार केल्यानंतर ब्रिटनच्या आर्थिक जीवनाची घडी नीटपणें बसविण्यासाठी सरकारनें उत्पादन, वहातूक, बोटी बांधणें, नवीन घरें बांधणें, अन्नाची आयात इ. बाबतींत कशी सुधारणा केली, तिचे परिणाम काय झाले व आज १९४७ मध्यें ब्रिटनचें भवितव्य कोणत्या धोरणावर अवलंबून आहे ह्या गोष्टींची माहिती देणारें एक श्वेतपत्रक त्या सरकारनें प्रसिद्ध केलें आहे,व त्याला मुख्य प्रधानांनीं प्रस्तावना लिहिली आहे. इंग्रज लोकांची चिकाटी, उद्योगतत्परता व त्यांच्या राजकीय संस्थांचा चिवटपणा ह्या पत्रकावरून दिसून येतो, व हिंदी जनतेनेंहि आर्थिक प्रश्नांचे बाबतांत कसें जागरूक व कार्यतत्पर राहिलें पाहिजे हेंहि आपणाला समजून येतें. एखाद्या राष्ट्राची परिस्थिति नैसर्गिक साधनसामुग्रीपेक्षां तेथील लोकांच्या अंगभूत गुणांवर कशी अवलंबून असते हें ह्या श्वेतपत्रकावरून दिसून येतें. युद्ध परिस्थितीला इंग्लिश जनतेनें जसें सहा वर्षें तोंड दिलें, त्याचप्रमाणें गेल्या दीड वर्षांत तिनें आर्थिक परिस्थितीला तोंड दिलें, व चिरकालीन यश टिकवावयाचें असेल तर ह्यापुढेंहि परिस्थितीला आर्थिक दृष्ट्या असेंच तोंड दिलें पाहिजे.

एकंदर वार्षिक उत्पन्नापैकीं १९३८ सालीं इंग्लंडनें ७८ टक्के उत्पन्न नेहमींच्या जीवनविषयक गरजांवर खर्च केलें. परंतु युद्धकाळांत नेहमींच्या गरजांवर उत्पन्नाचा फक्त ५४ टक्के खर्च केला. १९४७ सालीं उत्पन्नाच्या ६६½ टक्के खर्च जीवनविषयक गरजांवर खर्चितां येईल अशी योजना आहे. संरक्षणावर १९३८ सालीं ७ टक्के खर्च होत होता, तर १९४५ सालीं वार्षिक उत्पन्नाचा ४९ टक्के खर्च संरक्षणावर झाला, व १९४७ सालीं तो ११ टक्के होणार आहे. राष्ट्रीयकरणामुळें इतर राष्ट्रीय खर्चाचें प्रमाण वाढत चाललें आहे. युद्ध—पूर्व काळांत भांडवली खर्च उत्पन्नाच्या १६ टक्के होत होता, तो १९४५ सालीं ऐन युद्धपरिस्थितींत ६ टक्के झाला, परंतु आतां नवीन सुधारणा करण्यासाठी १९४७ सालीं भांडवली खर्चाचें प्रमाण उत्पन्नांच्या २० टक्के ठेवण्यांत येणार आहे. आयात मालाची किंमत साधारणपणें युद्ध—पूर्व कालाइतकीच, म्हणजे वार्षिक उत्पन्नांच्या १७ ते १८ टक्के इतकी राहिली आहे. परंतु निर्यात मालाची किंमत १९३८ सालीं उत्पन्नाच्या ११ टक्के होती. ती १९४७ सालीं उत्पन्नाच्या १४ टक्के इतकीं राहील असा अंदाज आहे. येथें उल्लेखिलेले सर्व फरक हें ब्रिटिश लोकांच्या योजना-चातुर्याचें फळ आहे. कारण, ब्रिटनची नैसर्गिक परिस्थिती अनुकूल नाहीं.

सध्यां इंग्लंडच्या आर्थिक जीवनांतील मुख्य प्रश्न म्हणजे कोळशाची टंचाई होय. सर्व तऱ्हेचें उत्पादन कोळशाच्या पुरवठ्यावर अवलंबून आहे. १९४६ सालीं कोळशाचें उत्पादन १९ कोटि टन झालें. १९४७ सालीं तें २० कोटि टन करणें हें उद्दिष्ट आहे. ह्यासाठी ह्या धंद्यांत जास्त मजूर आकर्षित केले जातील व मजूर व यंत्रे ह्यांची कार्यक्षमता वाढविली जाईल. संरक्षण खात्यांत १९४६ सालीं १४,२७,००० माणसें होतीं, परंतु मार्च १९४८ पर्यंत त्यांची संख्या १०,८७,००० इतकी राहील. ह्यामुळें आर्थिक उत्पादनासाठी जास्त माणसें मिळूं शकतील. डिसेंबर १९४६ मध्यें मजुरांची संख्या १,८१,२२,००० होती ती १९४७ अखेर १,८४,००,००० इतकी होईल. म्हणजे त्यांत २७८ हजारांनीं वाढ होईल. मनुष्यबळाचीहि इंग्लंडला टंचाई आहे. परकी मजूर आणून माणसाची टंचाई दूर करतां येईल पण ह्या बाबतींत मजूर संघटनेचा विरोध होता, तो आतां दूर होणें संभवनीय आहे. प्रत्येक मजुराची कार्यक्षमता वाढविण्याचेहि प्रयत्न सुरू आहेत. त्यामुळें मजुरांचे कामाचे तास कमी होणें मात्र संभवनीय नाहीं. ब्रिटिश मजुरांच्या ठिकाणीं परिस्थितीचें दडपण लक्षांत घेऊन समाधानी वृत्तीनें काम करण्याची तत्परता दिसून येते. ही राष्ट्रीय वृत्ति हिंदी मजूरवर्गानें अनुकरणीय आहे.

एकंदरींत इंग्लंडचें भवितव्य फारसें निराशाजनक दिसत नाहीं. कारण चिवटपणानें परिस्थितीला तोंड देण्याची वृत्ति ब्रिटिश लोकांत दिसून येते. परराष्ट्रीय आयात व इतर गोष्टी ह्यासाठी १९४७ सालीं १६२½ कोटि पौंडांची आवश्यकता आहे. पैकीं ३५ कोटि पौंडाची उसनवारी केली जाईल, ७½ कोटि पौंड अदृश्य आयातीमुळें निर्माण होतील, व राहिलेल्या १२० कोटि पौंडांच्या किंमतीच्या मालाची ब्रिटनला निर्यात करावी लागेल. ह्यामुळें १९३८ च्या निर्यातीच्या मानानें १९४७ सालीं १४० टक्के निर्यात करावी लागेल. १९४६ सालीं ११० ते ११५ टक्के निर्यात झाली होती.

मजूर सरकारनें प्रसिद्ध केलेल्या श्वेत-पत्रिकेंत आर्थिक नियोजन म्हणजे काय ह्याची चर्चा केली आहे. नंतर जुलै १९४५ पासून १९४६ अखेर पर्यंत आर्थिक व औद्योगिक जीवनांत सरकारनें कोणत्या गोष्टी साध्य केल्या ह्याचा आढावा घेण्यांत आला आहे. त्यानंतर १९४७ चा आर्थिक व औद्योगिक कार्यक्रम निश्चित करण्यांत आला आहे. कोळशाचा निर्यातीचा ठरविलेला आंकडा गाठणें, आणि यांत्रिक शक्ति व मजूर ह्यांची कार्यक्षमता ह्या गोष्टींवर भर देण्यांत आला आहे. ही सर्व जबाबदारी निरनिराळ्या व्यवसायांत कशी विभागली जावी ह्याचीहि चर्चा केलेली आहे. कोळसा व शक्ति ह्या बाबतींत विशेष काटकसर केली पाहिजे असेंहि दिग्दर्शित करण्यांत आलें आहे.

ब्रिटनमध्यें २ कोटि कामगार, देशांत उपलब्ध असलेल्या व बाहेरून आणलेल्या सामुग्रीपासून ८,५० कोटि पौंड किंमतीचे उत्पादन करतात. एकंदर उत्पादन वाढविण्यासाठीं मजूर व सामुग्री ह्यांचा जास्तींत जास्त उपयोग करणें व त्यांची कार्यक्षमता वाढविणें ह्या गोष्टींवर सरकारकडून विशेष भर दिला जातो. एकंदर उत्पादन हें निर्यात व अंतस्थ गरजा ह्यांना पुरें पडावें ह्यासाठी सरकारकडून आर्थिक धोरण ठरविणें, कांहीं बाबींचें राष्ट्रीयकरण, वस्तूंचें वांटप व भाव—नियंत्रण, उत्पादनावर नियंत्रण, आयातीला परवाने ठेवणें, भांडवलनियंत्रण इ. गोष्टी केल्या जातात.

ब्रिटनच्या आर्थिक जीवनाला पुढील गोष्टी मर्यादा घालणाऱ्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे ब्रिटनचें अस्तित्व परराष्ट्रीय व्यापारावर अवलंबून आहे. अमेरिकेच्या वर्चस्वामुळें तीव्र स्पर्धेला इंग्लंडला तोंड द्यावें लागतें. दुसरी गोष्ट म्हणजे ब्रिटनची नैसर्गिक साधनसामुग्री अगदीं साधारण दर्जाची आहे, व मनुष्य—बळहि घटत चाललें आहे. युद्धामुळें ब्रिटनचें भांडवल नष्ट झालें आहे, एवढेंच नव्हे तर कर्जाचा बोजाहि वाढला आहे. ब्रिटनची लोकशाही व परंपरागत गोष्टी ह्यामुळें नियोजन करणें कठीण जातें. तरीहि इंग्लंडनें परिस्थितीवर आजवर मात केली आहे. ब्रिटनच्या ह्या परिस्थितीपासून जबाबदार हिंदी जनतेनें बोध घेण्यासारखा आहे.

---

**अणु—शक्तीचा मनुष्यावर परिणाम**—अणु शक्ती उत्पादन करणाऱ्या कारखान्यांत काम करणाऱ्या तंत्रज्ञावर कोणते शारीरिक परिणाम होतात त्याची चौकशी व्हावी अशी मागणी रासायनिक कारखान्यांतून कामें करणाऱ्या कामगारांच्या संघातर्फे करण्यांत आली आहे.

## इंडियन अकौन्टन्सी बोर्डाची स्थापना

### हिशेबतपासनीसांच्या धंद्याचें नियंत्रण

कंपनी कायद्यांत कंपन्यांच्या वक्तशीर हिशेबतपासणीची तरतूद करण्यांत आलेली आहे. त्या कायद्यांतील १४४ वें कलम ऑडिटरांची नेमणूक व त्यांची लायकी ह्यासंबंधीं आहे. ह्याविषयींचे सर्व अधिकार आज गव्हर्नर जनरल इन कौन्सिलकडे आहेत. ही जबाबदारी हिशेबतपासनीसांच्याच स्वतंत्र संस्थेनें पुढें पत्करावी आणि त्या संस्थेनें आपल्या सभासदांची लायकी, शिस्त, वागणूक, इत्यादि बाबत आवश्यक ती व्यवस्था करावी, असें ध्येय १४४ व्या कलमांत अभिप्रेत आहे. अशा स्वतंत्र संस्थेच्या स्थापनेचा प्रश्न हिंदुस्थान सरकारपुढें कित्येक दिवस आहे आणि आतां त्यानें इंडियन अकौंटन्सी बोर्डाची एक योजना तयार केली आहे. बोर्डावरील २५ सभासदांपैकीं १३ सभासदांची निवड वेगवेगळ्या प्रांतांतील रजिस्टर्ड अकौंटंट्सनीं करावी आणि १२ सभासद नियुक्त असावेत, अशी त्या बोर्डाची नियोजित घटना आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूचे दोन अधिकारी; जॉइंट स्टॉक कंपन्यांचे रजिस्ट्रार; इन्कमटॅक्स अपेलेट ट्रायब्युनलचा अकौंटंट सभासद; असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स, फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि फेडरेशन ऑफ मुस्लिम चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्यांचा प्रत्येकीं एक प्रतिनिधी; सरकारी अधिकारी, इत्यादींचा समावेश नियुक्त सभासदांत होईल. बोर्डाकडे सरकारनें ऑडिटरांच्या व्यवसायावरील नियंत्रणाबाबत सर्व अधिकार सोंपविण्याचें ठरविलें आहे; अगदी थोडे राखीव अधिकार स्वतःकडे ठेवले आहेत.

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

| कंपनी | धंदा | मान्यता दिलेलें भांडवल ( रु. ) | शेरा |
|---|---|---|---|
| अकबर कॉटन मिल्स टेक्स्टाइल्स लि. बंगाल. | कापडाची गिरणी | ३५,००,००० | नवी कंपनी |
| इंटरनॅशनल फ्लोर अँड सेंट्रल मिल्स लि. लयालपूर पंजाब. | पिठाची गिरणी बर्फाचा कारखाना, कोल्ड स्टोअरेज व बिस्किटें | १५,००,००० | नवी कंपनी |
| राजहंस ऑइल अँड सोप इंडस्ट्रीज लि. मद्रास. | ऑइल्स आणि साबण | ७,५०,००० | नवी कंपनी |
| पीरदन जुहरमल बँक लि. मद्रास. | बँकिंग | २,००,००० | जु. बँकेचें नवें भांडवल |
| डनलॉप रबर कंपनी लि. कलकत्ता. | रबर टायर्स आणि इतर रबराचा माल | ५०,००,००० | जु. कं. चें नवें भांडवल |
| एअर वेज ( इंडिआ ) लि. कलकत्ता. | विमान-वाहतूक | २५,००,००० | जु. कं. चें नवें भांडवल |
| बंगलोर वूलन, कॉटन अँड सिल्क मिल्स कं. लि. बंगलोर. | सूत आणि कापडाची गिरणी | २०,२५,००० | बोनस शेअर्स |

**ब्रि. इं. फेअरमध्यें हिंदी माल**—ब्रिटिश इंडस्ट्रिज फेअर ह्या लंडन येथील प्रदर्शनांत हिंदी मालासाठी एक स्टॉल घेण्यांत आला आहे.


दि

# ट्रिनिटी मेटल वर्क्स लि. मुंबई

अधिकृत व विक्रीस काढलेलें भांडवल

## रु. ५,००,००० पांच लक्ष

### संचालक मंडळ

(१) चेअरमन—दि. ब. मोतीलाल बालमुकुंद मुथा, सातारा. (२) डायरेक्टर बोर्डाचे उपाध्यक्ष—श्री. शिं. शं. सक्री, बागलकोट. (३) कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष—श्री. मा. ग. देसाई, मुंबई. (४) शेट अबीदिन एस. तयबजी, मुंबई. (५) श्री. अ. बा. पाटील, कोल्हापूर. (६) श्री. त्र्यं. य. फडके, मुंबई. (७) श्री. मा. रा जोशी, पुणें. (८) श्री. ग. स. वैद्य, पुणें. (९) श्री. ल. बा. कोकणे, मुंबई (एक्स ऑफिशिओ) (१०) श्री. स. धों. चव्हाण, मुंबई (एक्स ऑफिशिओ) (११) श्री. व. न. म्हैसूर (एक्स-ऑफिशिओ)

### पत्र्याचे डबे तयार करणाऱ्या ट्रिनिटीचें उज्ज्वल भवितव्य

● लहान मोठ्या आकाराचे पत्र्याचे डबे करणाऱ्या ट्रिनिटी मेटल वर्क्सचें लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें असून सध्या रोजीं सुमारें दहा हजार डबे या कारखान्यांत तयार होत आहेत. युद्धोत्तर उद्योगधंद्यांच्या गरजा लक्षांत घेतां पॅकिंगसाठीं पत्र्याचे डबे अद्ययावत् पद्धतीनें करणारा कारखाना किफायतशीर ठरणार असून पहिल्याच वर्षी सहा टक्के नफा भागीदारांना वाटतां येईल अशी संचालक मंडळास खात्री वाटते.

● सहा टक्के नफा भागीदारांना देतां आला नाहीं तर मॅनेजिंग एजन्सीचा पगार त्या प्रमाणांत कमी घेण्याचें मॅनेजिंग एजंटांनीं कबूल केलें आहे.

● कंपनी कोल्हापूर, खानदेश, गुजराथ, या भागांतून वरील मालाचे उत्पादनासाठीं सबसीडीअरी कंपनी काढणार असून सरकारकडे २५ लक्ष रु. चें भांडवल उभें करण्यास परवानगी मागणार आहे.

● एकंदर भांडवल रु. १०० च्या एकूण पांच हजार ऑर्डिनरी शेअर्समध्यें विभागलेलें असून त्यापैकीं डायरेक्टर्स, मॅनेजिंग एजंटस, त्यांचे स्नेही व हितचिंतक यांनीं तीन लक्ष बासष्ट हजार रु. चे शेअर्स विकत घेतले असून बाकीचे एक लक्ष अडतीस हजाराचे शेअर्स विक्रीसाठी बाहेर काढले आहेत. अर्जासोबत रु. ५० प्रत्येक शेअरसाठीं, ॲलॉटमेंट नंतर रु. ३० प्रत्येक शेअरसाठी, बाकीचे तसेच शेअर मागें रु. २० ॲलॉटमेंटनंतर ? महिन्यांनीं बोर्डास योग्य वाटल्यास मागण्याचा अधिकार आहे.

शेअरसाठीं करावया चे अर्ज, माहिती पत्रक वगैरेसाठा कंपनीचे पत्त्यावर अथवा श्री. व्ही. एन. म्हैसूर, एम. ए., एलएल. बी., मॅनेजर, युनीम म्यूच्युअल विमा कंपनी लि., ८६६ सदाशिव पेठ पुणें २ यांचेकडे पत्रव्यवहार करावा.

**मेसर्स कोकणे, म्हैसूर आणि कंपनी**
मॅनेजिंग एजंटस.

रजिस्टर्ड ऑफिस, ३६२ अ. विठ्ठलभाई पटेल रोड, गिरगांव, मुंबई ४.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५/१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.